रे.मू.नं. ०९/२०२०

कदम वि. कदम

<u>निशाणी क्र. १८ व २० वरील संयुक्तीक आदेश</u>

(पारित दिनांक १७/०१/२०२६)

वादी यांनी मयत प्रतिवादी क्र. ४ यांचे वारस रेकॉर्डवर आणणेकरीता झालेला जवळपास २३ महिने इतका विलंब माफ होउन मिळणेकरिता तसेच, त्यांच्या विरुद्ध झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होऊन मिळणेकरीता प्रस्तुतचे अर्ज अनुक्रमे नि.क्र. १८ व २० वर दाखल केले आहेत.

२. वादीच्या कथनानुसार, प्रस्तुतचा दावा निरंतर व तुर्तातुर्त ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्याचे कामकाज चालु असताना प्रतिवादी क्र. ४ रामचंद्र आण्णा कदम हे दि. २८.०२.२०२३ रोजी मयत झाले. सदरचा वाद स्थावर मिळकतीबाबत असल्याने त्यांचे वारसांना दाव्याचे कामी सामील करणे आवश्यक व जरुरीचे आहे. त्यांचे वारस दि. २८.०५.२०२३ पर्यंत म्हणजेच ९० दिवसांचे आत रेकॉर्डवर घेणे आवश्यक होते. परंतु, सदर ९० दिवसांचा कालावधी वगळुन सुमारे २३ महिन्यांचा विलंब वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झाला आहे. सदरचा विलंब जाणुनबुजून केलेला नाही. मयत प्रतिवादी क्र. ४ चे मृत्युचे दाखले, वारसांची नावे व पत्ते मुदतीत मिळून आले नाहीत. तसेच, वादी हे शेतकरी असल्यामुळे त्यांच्या कामामुळे तसेच कायद्याचे अज्ञानीपणामुळे व आजारपणामुळे मुदतीत वारस रेकॉर्डवर घेता आले नाहीत. सदरकामी झालेला विलंब माफ होऊन मिळणे कायद्याचे व अंतिम न्यायाचे दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहे. तसेच, वादी यांनी मुदतीत वारस रेकॉर्डवर न घेतल्याने दावा अबेट झाला आहे. सदरचा अबेटमेंटचा आदेश रद्द होऊन मिळणेदेखील अंतिम न्यायाच्या दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहे. तसे न झाल्यास वादीचे अतोनात नुकसान होणार आहे. सबब, २३ महिन्यांचा झालेला विलंब माफ होऊन अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात यावा अशी विनंती वादी यांनी केली.

३. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी नि.क्र. २० चे अर्जाचे पाठीमागील बाजुस म्हणने दाखल करुन, वादी २३ महिन्यांचा विलंब माफ करुन मागत असून विलंबाची कारणे योग्य व संयुक्तीक नाहीत. सबब, अर्ज नामंजुर करणेत यावा अशी विनंती प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी केली.

४. अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले, प्रस्तुतचा दावा निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. नि.क्र. २४ लगत वादीने मयत प्रतिवादी क्र.४ यांचे मृत्युचे प्रमाणपत्र दाखल केले असून सदर प्रतीचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र. ४ दि.२८.०२.२०२३ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. वादीचे अर्जातील कथनाप्रमाणे, मयत प्रतिवादी क्र. ४ चे मृत्युचा दाखला, वारसांची नावे व पत्ते मुदतीत मिळून आले नाहीत. तसेच, वादी हे शेतकरी असल्यामुळे त्यांच्या कामामुळे तसेच कायद्याचे अज्ञानीपणामुळे व आजारपणामुळे मुदतीत वारस रेकॉर्डवर घेता आले नाहीत. विलंबास झालेल्या कारणांना पुष्टी देणारा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल नाही. तसेच, विलंबासाठी दिलेली कारणे देखील योग्य व संयुक्तीक नाही. परंतु, प्रस्तुत अर्जाचे पृष्ठर्थ वादीने प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. त्यामुळे त्याचे कथनांमध्ये तथ्य असल्याचे नाकारता येणे न्यायोचित होणार नाही. प्रस्तुत दाव्याचे कामी प्रतिवादी क्र. ४ याचे वारस अभिलेखावर येणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. दाव्याचे स्वरुप पाहता दाव्याचा निकाल गुणावगुणांवर लागणेसाठी प्रस्तुत प्रतिवादी क्र. ४ चे वारस अभिलेखावर असणे अत्यंत गरजेचे आहे. सबब, मयत प्रतिवादी क्र. ४ यांचे विरुद्ध प्रस्तुतचा दावा अबेट झाल्याचे तसेच, मयत प्रतिवादी क्र. ४ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास २३ महिन्यांचा विलंब झाल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. वरील सर्व कारणांचा एकत्रीत विचार करता मी पुढील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

<u>आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज रक्कम रु. ५००/- च्या खर्चाने मंजुर करण्यात

येत आहे.

२. खर्चाची रक्कम वादी यांनी पुढील तारेखस अथवा त्यापुर्वी तालुका विधी सेवा समिती पंढरपुर यांना अदा करावयाची आहे.

३. मयत प्रतिवादी क्र. ४ याचे विरुद्ध झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येत आहे. तसेच, मयत प्रतिवादी क्र. ४ याचे वारस अभिलेखावर घेणेकरीता झालेला सुमारे २३ महिन्यांचा विलंब माफ करण्यात येत आहे.

४. उभयपक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर)

GHORPADE PRIYA BALASAHEB

Digitally signed by GHORPADE PRIYA BALASAHEB
Date: 2026.01.20 16:31:40 +0500

(श्रीमती पी. बी. घोरपडे)

दि. १७/०१/२०२६.

७वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पंढरपूर

रे.मू.नं. ०९/२०२०

कदम वि. कदम

<u>आदेश नि.क्र. २२ वर</u>

(पारित दिनांक १७/०१/२०२६)

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. ४ हे मयत झाले असल्याने त्यांचे कायदेशीर वारस अभिलेखावर आणणेकरीता दाखल केला आहे.

२. वादीच्या कथनानुसार, प्रस्तुतचा दावा निरंतर व तुर्तातुर्त ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्याचे कामकाज चालु असताना प्रतिवादी क्र. ४ रामचंद्र आण्णा कदम हे दि. २८.०२.२०२३ रोजी मयत झाले. सदरचा वाद स्थावर मिळकतीबाबत असल्याने त्यांचे वारसांना दाव्याचे कामी सामील करणे आवश्यक व जरुरीचे आहे. त्यांचे वारस दि. २८.०५.२०२३ पर्यंत म्हणजेच ९० दिवसांचे आत रेकॉर्डवर घेणे आवश्यक होते. परंतु, सदर ९० दिवसांचा कालावधी वगळुन सुमारे २३ महिन्यांचा विलंब वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झाला आहे. सदरचा विलंब जाणुनबुजून केलेला नाही. मयत प्रतिवादी क्र. ४ चे मृत्युचे दाखले, वारसांची नावे व पत्ते मुदतीत मिळून आले नाहीत. तसेच, वादी हे शेतकरी असल्यामुळे त्यांच्या कामामुळे तसेच कायद्याचे अज्ञानीपणामुळे व आजारपणामुळे मुदतीत वारस रेकॉर्डवर घेता आले नाहीत. मयत प्रतिवादी क्र. ४ रामचंद्र आण्णा कदम याचे वारस रेकॉर्डवर घेणे गरजेचे आहे. मयत प्रतिवादी क्र. ४ चे वारस रेकॉर्डवर येणे अत्यंत गरजेचे व आवश्यक असल्यामुळे ते रेकॉर्डवर घेण्यास परवानगी मिळुन त्यांना दाव्यामधे समाविष्ट करणेकरीता सरनाम्यात दुरुस्ती करण्यास परवानगी असावी अशी विनंती वादी यांनी केली.

३. प्रतिवादी क्र. १ ते ३ तर्फे अर्जाचे मागील बाजुस म्हणने दाखल असून त्याद्वारे त्यांनी न्यायाच्या दृष्टीने जरुर ते आदेश पारीत करणेत यावेत असे नमुद केले

आहे.

४. अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले, प्रस्तुतचा दावा निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. नि.क्र.२४ लगत वादीने मयत प्रतिवादी क्र. ४ यांचे मृत्युचे प्रमाणपत्र दाखल केले आहे. सदर प्रतींचे अवलोकन केले असता, मयत प्रतिवादी क्र. ४ दि. २८.०२.२०२३ रोजी मयत झाल्याचे दिसून येते.

५. जर दाव्यातील एखादा पक्षकार मयत झाला असल्यास भारतीय मुदतीच्या कायद्यातील तरतुदींप्रमाणे सदरची व्यक्ती मयत झाल्यापासून ९० दिवसांचे आत त्याचे कायदेशीर वारस अभिलेखावर घेणे बंधनकारक आहे. जर दाव्यातील एखादा पक्षकार मयत झाला असल्यास भारतीय मुदतीच्या कायद्यातील तरतुदींप्रमाणे सदरची व्यक्ती मयत झाल्यापासून ९० दिवसांचे आत त्याचे कायदेशीर वारस अभिलेखावर घेतले न गेल्यास दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ३ (२) प्रमाणे त्या मयत व्यक्ती विरुद्ध दावा अबेट होतो. वादीचे कथनाप्रमाणे, प्रस्तुत मयत प्रतिवादी क्र. ४ चे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी झालेला विलंब व अबेटमेंट ही नि.क्र. १८ व २० वरील संयुक्त आदेशान्वये माफ व रद्द केली असून त्यामुळे दावा प्रतिवादींविरुद्ध चालविणेचा अधिकार मयत प्रतिवादी क्र. ४ चे वारसांमध्ये टिकुन असल्यामुळे त्यांना दाव्याचे कामी सामील करुन घेणे गरजेचे आहे. सबब, मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

१ प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२ मयत प्रतिवादी क्र. ४ रामचंद्र आण्णा कदम यांचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी देण्यात येते. प्रस्तावित वारस पुढील तारखेस किंवा त्यापूर्वी अभिलेखावर घेण्यात यावेत.

३ वादी पक्षास सदर आदेशान्वये जरुर ती दुरुस्ती करुन

आवश्यक तितक्या दुरुस्त दाव्याच्या नकला पुरविण्याचे सुचित करण्यात येते.

४ सदर आदेशाची उभयपक्षांनी नोंद घ्यावी.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर)

GHORPADE PRIYA BALASAHEB

Digitally signed by GHORPADE PRIYA BALASAHEB
Date: 2026.01.20 16:31:48 +0500

(श्रीमती पी.बी. घोरपडे)

दि. १७/०१/२०२६. **७वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**

पंढरपूर